# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-२५ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २३ जानेवारी २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## दिव्यात पालिका प्रशासनाकडून...

# नियोजनाची टंचाई!

**पाणी वाढवण्याच्या घोषणा होतात,पाणीटंचाई संपत नाही... कारण नियोजन नाही!**

**ज्या नळ कनेक्शन्सना पाणीच येत नाही, त्यांना लाखोंची बिलं एकदम धाडली जातात!**


**महिन्याला टँकरवर दोन ते तीन हजार रुपये खर्च करणारे नागरिक पालिकेची २०० ते ३०० रुपयांची पाणीपट्टी भरणार नाहीत का?**

**दिवा न्यूज विशेष /एस.के.**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा शहरात मागील अनेक वर्षांपासून पाणीटंचाई आहे. जेव्हा जेव्हा दिवा शहरातील पाणीटंचाई बाबत येथील नागरिक, राजकीय पक्ष आवाज उठवतात तेव्हा जवळपास प्रत्येक वेळेला दिवा शहरात पालिका काही एम एल डी मध्ये पाणी वाढवण्याच्या घोषणा करते.

यामध्ये कधी कधी पाच एम एल डी,कधी सहा एम एल डी तर कधी दहा एम एल डी पाणी वाढवण्याच्या घोषणा झालेल्या आहेत.इतके पाणी वाढूनही दिव्याची पाणीटंचाई काही कमी होत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

दिवा शहरातील अनेक इमारतींच्या खाली पाण्याचे टँकर आपल्याला आजही पाहायला मिळतात.चार- पाच माळ्याच्या इमारतींना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो.पाणीटंचाई बाबत बोलताना काही कुटुंब सांगतात... महिन्याचा जवळपास तीन ते चार हजार रुपये खर्च त्यांचा पाण्यावर होतो! इतकं महाग पाणी अन्य कोणत्याही शहरात नसेल. पाणी प्रश्नावर आंदोलन होतात, त्यानंतर पाणी वाढल्याच्या घोषणा होतात,काही एमएलडी मध्ये पाणी वाढून सुद्धा दिव्याचा पाणी प्रश्न काही सुटत नाही. या मागची कारण काय? याचा शोध घ्यावा असे पालिका प्रशासनाला वाटत नाही. जर हा शोध घेतला गेला असता तर पाण्यावर महिन्याला हजारो रुपये खर्च करणाऱ्या नागरिकांच्या समस्या ठाणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला कळल्या असत्या.दिव्यात ज्या काळी चाळी अस्तित्वात होत्या त्या चाळींना दिलेल्या पाणी कनेक्शनची बिले आज तिथे इमारतीत राहणाऱ्या लोकांना येतात,असा कारभार दिव्यात काही ठिकाणी सुरू आहे. ज्या पाणी कनेक्शनला पाणीच येत नाही अशा कनेक्शनची दोन- तीन लाखाची बिल नागरिकांना



| | |
|---|---|
| एकूण | 10,920.00 |
| चालू वर्षाची एकूण रक्कम : | 21,840.00 |
| डी.पी.सी/दंड : | 59,938 |
| थकबाकीसह एकूण रक्कम : | 214,018.00 |

15408/-

य तारखेपूर्वी / तारखेस नं भरल्यास त्यावर प्रतिमहा १% विलंब शुल्कआकारण्यात येईल.
करणे करीता अधिनियमाअंतर्गत कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी ४)पाणी
ती दर्शविलेली गेली नसल्यास, सदर बिलामध्ये दुरुस्ती करण्यात येईल व दुरुस्ती केल्यानंतर

**अनेक वेळा पाणी येत नसल्याने त्या पाणी कनेक्शन कडे नागरिकांचे दुर्लक्ष होते आणि त्या बंद कनेक्शनची थकबाकी वाढून ती लाखाच्या घरात जाते. दिव्यात असे अनेक प्रकार सुरू आहेत, पालिकेने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे!**

धाडली जातात. वस्तुस्थिती काय आहे, याचा अभ्यास दिवा प्रभाग समिती आणि पालिका प्रशासनात बसलेल्या अधिकाऱ्यांना नाही. जे लोक महिन्याकाठी हजारो रुपये पाण्यावर खर्च करू शकतात ते पालिकेने नियमित पाणीपुरवठा केला तर त्यांची महिना काठी असणारी २०० ते ३०० रुपयांची पाणीपट्टी भरणार नाहीत का? हा साधा प्रश्न आहे. परंतु या सुविधा द्यायच्याच नाहीत..पाणीपुरवठा नीट करायचाच नाही.. आणि बिल मात्र भरमसाठ धाडायची, असा तुघलकी कारभार दिव्यात सुरू आहे! ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.याकडे पालिका प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्तांनी गांभीर्याने लक्ष द्यायची गरज आहे. आज दिवा शहराची लोकसंख्या पाच लाखाच्या जवळपास आहे. इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या जीविताचा प्रश्न असणाऱ्या पाणी समस्येवर ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे. नव्या पाईपलाईन साठी निधी मंजूर केला, पालिका मुख्यालयातून काही एमएलडी पाणी वाढवण्याच्या घोषणा केल्या, म्हणून दिव्याचा पाणी प्रश्न सुटणार नाही हे प्रशासनाने समजून घेणे गरजेचे आहे. दिवा शहरातील शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचण्यासाठी जी यंत्रणा कार्यान्वित करण्याची जबाबदारी पालिका प्रशासनावर आहे,ती यंत्रणा आजही दिव्यात अस्तित्वात आलेली नाही. पाण्याच्या नावाने दिव्यामध्ये धंदा सुरू आहे.एकंदरीत संपूर्ण दिवा शहराचा अभ्यास केला तर पाणी समस्येचे मूळ हे प्रशासनाच्या लोकाभिमुख नसलेल्या कारभारामध्ये आहे. दिव्यातील पाणी समस्येवर खरंतर ठाणे महानगरपालिकेने एक स्वतंत्र कमिटी नियुक्ती करायला हवी. ज्या नागरिकांना तीन ते चार लाखाची बिलं धाडण्यात आली आहेत तेथील वस्तुस्थिती समजून घ्यायला हवी.ज्या पाण्याच्या लाईनला पाणीच कधी आलं नाही अशा लाईनची पाठवलेली बिले नागरिकांची पिळवणूक करणारी नाहीत का? याचा विचार व्हायला हवा.ठाणे महानगरपालिकेने दिवा शहरातील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा नियमितपणे सुरू केला तर दिवा शहरातून पाणीपट्टी थकीत राहणार नाही याची खात्री नागरिक त्यांना नक्कीच देतील. त्याच्या मागचं कारण असं येथील नागरिक टँकरवर महिन्यासाठी तीन ते चार हजार रुपये खर्च करतात. त्या नागरिकांना अडीचशे तीनशे रुपये पाणी पट्टी ही फार मोठी गोष्ट नाही.दिव्यातील पाणीटंचाईचं मूळ हे नियोजनाच्या टंचाईमध्ये आहे.ज्याला नागरिकांप्रती आस्था आहे, ज्याला नागरिकांच्या समस्या माहिती आहेत, अशा अधिकाऱ्याला पालिका आयुक्तांनी दिवा शहरात विशेष अधिकारी म्हणून पाठवायला हवं. येथील समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करायला हव्यात. ज्या अधिकाऱ्यांना दिव्यातील जनता आणि दिव्यातील समस्या या सोन्याची अंडी देणारी कोंबडी वाटतात त्यांच्याकडून दिव्याचा पाणी प्रश्न सुटेल असं वाटत नाही...दिसत नाही!

---

## दिवा शहर स्वच्छ व नीटनेटके होऊ नये अशीच दिवा प्रभाग समितीतील अधिकाऱ्यांची इच्छा

### मनसेचे शहराध्यक्ष तुषार पाटील यांचा गंभीर आरोप

**दिवा:-**दिवा स्टेशन परिसरातील फेरीवाले हटवण्याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आमदार राजू पाटील यांनी नुकतीच पालिका सहाय्यक आयुक्त शेख यांच्यासोबत चर्चा केल्याची माहिती दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी दिली.

दिवा मनसेने दिव्यातील रस्ते फेरीवाला मुक्त करावेत यासाठी पुढाकार घेतला असून त्याचा पाठपुरावा पालिका प्रशासनाकडे सुरू केला आहे.मनसेने दिवा स्टेशन फेरीवाला मुक्त करण्यासाठी याआधी अनेक वेळा आंदोलन केली आहेत. मात्र तात्पुरते फेरीवाले हटवल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी फेरीवाले बसतात, असा आक्षेप दिवा मनसेचे शहराध्यक्ष तुषार पाटील यांनी घेतला आहे. पालिका प्रशासनाचे दिवा प्रभाग समितीतील अधिकारी यांचीच दिवा शहर स्वच्छ व नीटनेटके होऊ नये अशी इच्छा असल्याचा गंभीर आरोप तुषार पाटील यांनी केला आहे. मुळात जी काम पालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांनी करायला हवीत ती वेळेवर केली जात नाहीत. त्यातून दिवा स्टेशन परिसरात वाहतूक कोंडी होते, असे तुषार पाटील यांचे म्हणणे आहे. शहरातील सर्व रस्त्यांचे फुटपाथ हे पालिका प्रशासनाने स्वतः हून मोकळे करायला हवेत.रस्त्यांवर व फुटपाथवर फेरीवाले बसत असतील तर ही पालिका प्रशासनाची जबाबदारी आहे, असे तुषार पाटील यांनी म्हटले आहे. दिवा शहरातील नागरिकांना चालण्यासाठी जे फुटपाथ तयार करण्यात आले आहेत ते फेरीवाला मुक्त करावेत असे आवाहन तुषार पाटील यांनी केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, २३ जानेवारी २०२३


# यूपीएससी मुख्य परीक्षेतील उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी घेतल्या 'मॉक इंटरव्हयू'

**ठाणे :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींकरिता ठाणे महापालिकेच्या सी. डी. देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमार्फत रविवारी आयोजित केलेल्या प्रतिरुप मुलाखती (MOCK-INTERVIEW) यशस्वीरीत्या पार पडल्या. मुलाखत देताना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना कशा पध्दतीत बदल केला पाहिजे? देहबोली कशा पध्दतीने हवी, आयकॉन्टेक्ट कसा असला पाहिजे, तसेच डीएएफ फॉर्मवर कशा पध्दतीने यूपीएससी समिती कसे प्रश्न विचारु शकतात या व इतर अनेक बाबींबाबत सखोल असे बहुमूल्य मार्गदर्शन तज्ज्ञांनी केले.

स्वतंत्र भारताच्या पहिल्या नोटेवर सही करणारे महाराष्ट्राचे कंठमणी म्हणून प्रसिद्ध असणारे चिंतामण द्वारकानाथ देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीचे औचित्य साधून ठाणे महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या निर्देशानुसार मॉक इंटरव्हिवचे आयोजन करण्यात आलेले होते.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केल्यानंतर मुलाखतीबाबत विद्यार्थ्यांवर प्रचंड दडपण असते. शिवाय अनेक




विद्यार्थ्यांना अशा मुलाखतीची खूप भिती वाटत असून, त्यांच्यामध्ये नैराश्य निर्माण होते. त्या अनुषंगाने यूपीएससीच्या स्पर्धा परीक्षेत मुलाखतीस यशस्वीपणे सामोरे जाण्याकरीता व विद्यार्थ्यांमधील मुलाखतीबाबत असलेली भिती दूर करणेकरीता मॉक इंटरव्हिव्यूचे आयोजन करण्यात आले होते.

सदर मुलाखतीच्या सत्रात पॅनलमध्ये महाराष्ट्र शासनाचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव के. पी. बक्षी (IAS), मुंबई रेल्वेचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे (IPS), ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल (IAS), Mumbai NIA चे SP डॉ. शैलेंद्र मिश्रा (IPS), संदिप कदम (IAS), माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे संचालक राहुल तिडके (IIS), DRI Mumbai चे Additional Director राजलक्ष्मी कदम (IRS), यूपीएससी आणि एमपीएससी अभ्यासक्रमाचे तज्ज्ञ मार्गदर्शक भुषण देशमुख आदी मान्यवरांनी UPSC मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींच्या मॉक इंटरव्हिव्यू घेतल्या.

ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदिप माळवी, उपआयुक्त अनघा कदम व संचालक महादेव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला असून कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गिरीष झेंडे यांनी केले.

# बाळासाहेबांचे अखंड हिंदुस्थानाचे स्वप्न पुर्ण करा

## जैन धर्मगुरुंची मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्याकडे मागणी

**ठाणे :** अखंड हिंदुस्थान हे बाळासाहेबांचे स्वप्न होते आणि ते राज ठाकरे आपण साकार करावे, अशी मागणी वजा कळकळीची अपेक्षा ठाण्यात शनिवारी जैन धर्मगुरुंनी बोलून व्यक्त केली.राज ठाकरे यांच्या आगमन ठाण्यातील टेंभीनाका येथील जैन धर्मियांच्या मंदिरामध्ये होताच, जय जय महाराष्ट्र माझा आणि आया है राजा अशी मराठी गीते लावून जंगी स्वागत केले. राज यांनी मंदिरात जाऊन दर्शन घेतले आणि त्यानंतर ते मंदीरामधील सभा मंडपातील कार्यक्रमस्थळाला त्यांनी भेट दिली.

ठाणे येथील टेंभीनाका परिसरात शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचे कार्यालय असून येथून आता बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे कामकाज चालते. त्यामुळे टेंभीनाका परिसर हा संपुर्ण जिल्ह्याचा राजकीय केंद्रबिंदू म्हणून ओळखला जातो. याच भागात जैन समाज मोठ्या प्रमाणात राहत असून या भागात समाजाचे मोठे मंदीर आहे. या मंदीरामध्ये जैन समाजाच्यावतीने शनिवारी सकाळी ८ वाजता एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थितीती लावली. त्यांच्या स्वागतासाठी जैन समाजातील बांधव मोठ्या संख्येने मंदीर परिसरात उपस्थित होता.

याप्रसंगी कार्यक्रमात बोलताना,जैन धर्मगुरु आचार्य चितानंद महाराज यांनी आमची राज ठाकरे यांच्याकडून एक अपेक्षा आहे. ही अपेक्षा छोटी नाहीतर खूप मोठी आहे. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पुर्ण करण्याची अपेक्षा आहे. महाराष्ट्र आणि भारताबद्दल बोलत नाही तर अखंड हिंदुस्थान हे आमचे स्वप्न आहे. कश्मीर अर्धा आपल्या ताब्यात आला आहे. आम्हाला पूर्ण कश्मीर हवा आहेच. पण, त्याचबरोबर पाकिस्तानही हवा आहे. अखंड हिंदुस्थान हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेही स्वप्न होते. हे स्वप्न तुम्ही पुर्ण करा. त्यासाठी आता आम्ही तुमचे स्वागतही केले आहे, असे ते म्हणाले.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# ताबा सुटल्याने अपघात कार चालक जखमी

**ठाणे:** घोडबंदर रोड येथून नितीन कंपनी येथील घरी कारने येताना,चालक गौरव चव्हाण (३६) यांचा त्या गाडीवरील ताबा सुटला. तसेच ती कार रस्त्याच्या बाजूला पार्क केलेल्या खासगी बस वरती जाऊन आदळली. या अपघातात गौरव यांच्या डोक्याला किरकोळ दुखापत झाली असून त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना जवळील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. ही घटना सोमवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास नाशिक - मुंबई महामार्ग, कॅडबरी सिग्नल जवळ घडली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी नौपाडा पोलीस, वर्तकनगर वाहतूक पोलीस, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. तसेच वाहतूक पोलिसांनी त्या कारला टोईंग वाहनाच्या मदतीने रस्त्याच्या एका बाजूला केले आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# पडीक पाण्याच्या टाकीत आढळला मृतदेह

**ठाणे:** वागळे इस्टेट, येथे कामगार रुग्णालयाच्या मागे वापर होत नसलेल्या पडीक पाण्याच्या टाकीमध्ये अनोळखी इसमाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सोमवारी दुपारच्या सुमारास निर्दशनास आला. तो मृतदेह व त्याचे अवशेष पाण्याच्या टाकीमधून काढून बाहेर काढून वागळे पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. ही टाकी अंदाजे ५० फूट लांब व १५ ते १८ फूट खोल आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी वागळे इस्टेट पोलीस, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, मल:निसरण विभागाचे कर्मचारी , अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच त्या टाकीमधून मल:निसरण विभागाच्या १ सक्शन गाडीच्या साह्याने पाणी उपसा केल्यानंतर तो मृतदेह व त्याचे अवशेष पाण्याच्या टाकीमधून बाहेर काढण्यात आले अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## शिवशाही बसच्या गिअर बॉक्सला आग

**ठाणे:** ठाण्यातून अर्नाळा येथे निघालेल्या शिवशाही बसच्या गिअर बॉक्स जवळ शॉर्टसर्किट होऊन किरकोळ आग लागली. ही घटना बुधवारी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय जवळ घडली. सुरक्षेच्या दृष्टीने बसमधील सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. बसच्या गिअर बॉक्समध्ये आग लागली. ही बाब लक्षात येताच चालकने बस थांबवून त्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली. पोलिसांकडून याबाबत आपत्ती व्यवस्थापन कक्षाला सांगताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, शहर वाहतूक पोलीस यांच्यासह अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. तोपर्यंत एस.टी. कर्मचाऱ्यांच्या व वाहतूक पोलिसांच्या मदतीने फायर एक्स्टिंग्युशर वापरून आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# लोकनेते शैलेश पाटील यांच्यावतीने रिलायन्स टॉवर परिसरात मोफत डोळे तपासणी शिबिर संपन्न








**दिवा:–** दिव्यातील लोकनेते माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या वतीने मुंब्रा देवी कॉलनी येथील रिलायन्स टॉवर परिसरात नागरिकांसाठी मोफत डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला गुरु दर्शन नगर व रिलायन्स टॉवर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाच्या वतीने माजी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी रिलायन्स टॉवर येथील कार्यालय परिसरात या शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी नागरिकांची मोफत डोळे तपासणी व अल्प दरात चष्मे वाटप करण्यात आले.हे शिबिर यशस्वी होण्यासाठी रिलायन्स टॉवर शाखेचे शैलेश पाटील यांचे कार्यकर्ते प्रदीप पाटील व इतर सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.



## दिवा विकास प्रतिष्ठानतर्फे मोफत दिनदर्शिका वाटप

दिवा विकास प्रतिष्ठाण आणि डॉ. श्रीकांत शिंदे मित्र मंडळाचे अध्यक्ष, माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या माध्यमातून दरवर्षी दिवा शहरातील नागरिकांना देण्यात येणारे मोफत दिनदर्शिकेचे वाटप यावर्षीही करण्यात आले. मुंब्रा देवी कॉलनी परिसरात शैलेश पाटील यांचे कार्यकर्ते व समाजसेवक संजय भगत यांनी दुकानदार व नागरिकांना हे मोफत वाटप केले.



साबे गाव येथील महिला बचत गट हळदी कुंकू समारंभाला भारतीय जनता पार्टीच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी हजेरी लावत शुभेच्छा दिल्या, त्या वेळचे छायाचित्र (छाया:–सुदेश सकपाळ)

## कोपरीत पाच दिवस रंगणार माघी गणेश जयंती सोहळा

**ठाणे:** कोपरी पूर्व येथील पारशीवाडी येथे दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही २५ जानेवारी २०२३ रोजी इच्छापूर्ती गणेश मंदिरातर्फे माघी गणेश जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे मंडळाचे १८ वे वर्ष आहे. पाच दिवस चालणाऱ्या या सोहळ्यामध्ये भजन, कीर्तन, पालखी सोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम अशी रेलचेल असणार आहे. हा गणेश जयंती उत्सव सोहळा २५ जानेवारी ते २९ जानेवारी २०२३ असा पाच दिवस चालणार आहे. सोहळ्यात दुसर्या दिवशी ह.भ.प. इंदोरे महाराज यांचे किर्तन व तिसर्या दिवशी काल्याचे किर्तन असणार आहे. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष राजेश चंद्रसेन घाडगे व कार्याध्यक्ष दीपक कदम यांनी केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com



# तलावपाळी परिसर कायमस्वरुपी फेरीवाला मुक्त ठेवा त्या फेरीवाल्यांसाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी

**ठाणे : शहराचा मानबिंदू समजला जाणारा परिसर म्हणजे तलावपाळी. ठाणेकरांच्या जिव्हाळ्याच्या असलेल्या या परिसरात दररोज मॉर्निंग वॉक पासून ते संध्याकाळपर्यंत नागरिकांची रेलचेल सुरू असते. या परिसरात नागरिकांना मोकळेपणाने फिरता यावे यासाठी तो परिसर हा फेरीवाला मुक्त करण्यात आल्याने नागरिकांनाही मुक्तपणे वावरणे शक्य होत आहे. वर्षानुवर्षे या ठिकाणी असलेल्या नोंदणीकृत फेरीवाल्यांचे योग्य पुनर्वसन होऊन त्यांचे उपजीविकेचे साधन कायम रहावे याकरिता फेरीवाल्यांसाठी पर्यायी जागा निश्चित करुन त्याचा खाऊगल्ली म्हणून विकास करण्याचे निर्देश सोमवारी ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले.**




*आयुक्त बांगर यांनी सोमवारी संपूर्ण मासुंदा तलावाची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यास उपायुक्त अतिक्रमण जी.जी. गोदेपुरे, उपायुक्त शंकर पाटोळे, सहाय्यक आयुक्त अजय एडके आदी उपस्थित होते.*

*सद्यस्थितीत संपूर्ण तलाव परिसर फेरीवाला मुक्त करण्यात आला आहे. तलावपाळी परिसरातील फेरीवाल्यांसाठी पर्यायी जागा निश्चित करून त्या जागेचा  खाऊ गल्ली म्हणून विकास करण्यात यावा. या ठिकाणी पिण्याचे पाणी, विद्युत दिवे आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात मात्र तलावपाळीच्या आजूबाजूचा परिसर कोणत्याही परिस्थितीत फेरीवाला मुक्त राहिल याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी आयुक्त बांगर यांनी दिल्या.*

*या पाहणी दौऱ्या दरम्यान संपूर्ण मासुंदा तलावाची पाहणी करुन नागरिकांना बसण्यासाठी असलेले कठडे दिवसातून किमान दोन वेळा धुवून स्वच्छ करुन परिसर नीटनेटका राहील याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. तलावाभोवती असलेले सुशोभित विद्युतपोलची आवश्यक देखभाल करुन ते कायमस्वरुपी सुस्थितीत राहतील. तसेच संपूर्ण तलावाभोवती आतील बाजूस एलईडी दिवे लावण्यात यावे, जेणेकरुन त्याचे प्रतिबिंब पाण्यात पडून या परिसराच्या सुशोभिकरणात भर पडेल या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सचूनाही त्यांनी दिल्या. तसेच पाणपोईलगतची जागा स्वच्छ राहिल तसेच पाणपोईची पाण्याची टाकी नियमित स्वच्छ करुन शुद्ध पाणी नागरिकांना मिळेल याकडे लक्ष देण्याच्या सूचना संबंधितांना बांगर यांनी दिल्या.*

*तसेच तलाव परिसरामध्ये ठिकठिकाणच्या भिंती, उड्डाणपुलाचे खांब, विद्युत डिपी व कठड्याला जाहिरात पत्रके चिटकविल्याचे दिसून आले, यामुळे या ठिकाणच्या सुशोभिकरणाला बाधा निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली. तरी संपूर्ण तलाव परिसरातील भित्तीपत्रके तातडीने काढून आगामी काळात कोणतीही भित्तीपत्रके लागणार नाही याची दक्षता घेवून दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही आयुक्त बांगर यांनी दिले.*

---

ठाण्यातील समता युथ फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

# 'त्या' निराधार बहिणींना मायेचा आधार

## मेट्रो दुर्घटनेतील मृत महिलेच्या मुलींची उचलली शैक्षणिक जबाबदारी



**ठाणे :** मेट्रोच्या कामाकरिता खोदलेल्या खड्ड्यामध्ये पिलरच्या सपोर्टसाठी लावलेली लोखंडी प्लेट कोसळून दहा दिवसांपूर्वी सुनिता कांबळे यांचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना ठाण्यातील विवियाना मॉल समोरील महामार्गावर घडली. पती बाबासाहेब कांबळे यांच्या निधनानंतर दोन्ही मुलींचा सांभाळ करण्यासाठी कचरा वेचणाऱ्या सुनिता यांचाही मृत्यू झाल्याने त्यांच्या स्नेहा व प्रमिला या दोन्ही मुलींच्या डोक्यावरील मायेचे छप्परच हरपले. एका क्षणात होत्याचे नव्हते झालेल्या निराधार बहिणींच्या मदतीसाठी कोणीच पुढे आलेले नसताना ठाण्यातील समता युथ फाऊंडेशनने या दोन्ही बहिणींच्या शिक्षणाचा सर्वतोपरी खर्च उचलला आहे. या निर्णयाचे पत्रच संस्थेच्या वतीने या बहिणींना नातेवाईकांच्या उपस्थितीत सुपूर्त करण्यात आले. त्यामुळे कोवळ्या वयात निराधार झालेल्या या बहिणींना मायेचा आधार मिळाला आहे.

वडाळा – कासारवडवली या मेट्रो टप्प्याच्या कामाकरिता खोदण्यात आलेल्या खड्ड्यामध्ये पिलरच्या सपोर्टसाठी लावण्यात आलेली लोखंडी प्लेट पडल्याने लोकमान्य नगर येथे राहणाऱ्या कचरावेचक सुनीता कांबळे यांचा मृत्यू झाला. पतीच्या मृत्यूनंतर त्यांनी काबाडकष्ट करून सुनीता यांनी मुलींचा सांभाळ केला होता. मात्र या घटनेनंतर त्यांच्या स्नेहा व प्रमिला या

अनुक्रमे दहावी व अकरावीत शिकणाऱ्या मुलींसमोर आता जगायचे कसे, असा यक्षप्रश्न उभा राहिला. कोणताच मदतीचा हात पुढे येत नसतानाच या घटनेचे गांभीर्य ओळखून समता युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष आदित्य धुमाळ यांनी कांबळे बहिणींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याची तयारी दर्शवली. फाउंडेशनचे सल्लागार राजन धुमाळ यांनी स्नेहा व प्रमिला या बहिणींची घरी जाऊन भेट घेत आस्थेने चौकशी केली. त्यानंतर या दोन्हीही बहिणींना त्यांच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत मदतीचे पत्र अध्यक्ष आदित्य धुमाळ यांनी सुपूर्त केले.

भविष्यात या दोघींच्या शिक्षणाची फी व शैक्षणिक साहित्याबाबत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, तसेच इतर कोणतीही मदत लागल्यास हक्काने सांगा, आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोत, असे वचन धुमाळ यांनी याप्रसंगी कांबळे बहिणींना दिले. यासोबतच समाजातील इतर दानशूर व्यक्ती, संस्थेला या बहिणींना मदत करायची असल्यास त्यांनी ९१६७२३६९६७ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

---

# येत्या २६ जानेवारीपासून ठाण्यात संस्कृती आर्ट फेस्टिवल

## पद्मश्री व पद्मभूषण उदित नारायण यांची उपस्थिती

**ठाणे :** प्रताप सरनाईक फाउंडेशन, विहंग प्रस्तुत संस्कृती आर्ट फेस्टिवल येत्या २६, २७, २८, २९ जानेवारी उपवन तलाव आयोजिण्यात आले आहे. यंदाचे हे सातवे वर्ष असून या वर्षाची थीम आहे वसुधैव कुटुंबकम् (One World One Family) आपण सर्व या सांस्कृतिक कार्यक्रमातून आनंदी व उत्साही राहून पर्यावरणाशी जवळीक साधूया, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

विहंग संस्कृती आर्ट फेस्टिवल हा दरवर्षी होणारा एक मोठा महोत्सव आहे. यावर्षी सुद्धा महोत्सवाच्या उद्धाटनाला १००० पेक्षा जास्त शाळकरी मुले उपस्थित राहणार आहेत, तसेच या चार दिवसात ६०० पेक्षा जास्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय कलाकार सहभागी होणार आहे. सर्व कलाकार ओपन लीग परिसरातील चार विविध सुसज्जित स्टेजवर आपली कला सादर करणार आहेत तसेच या महोत्सवात भरपूर स्टॉल्स उपलब्ध आहे या स्टॉल्समध्ये हँडीक्राफ्टचे स्टॉल्स व विविध प्रकारच्या खाण्यांचे फूड स्टॉल असल्यामुळे याचा खवय्यांना मनसोक्त आनंद घेता येईल

महोत्सवातील इतर आकर्षण – लाईट व लेझर शो, आर्ट व क्राफ्ट वर्कशॉप, एडवेंचर स्पोर्ट्स, विहंग संस्कृती आर्ट फेस्टिवल ला कोणतेही तिकीट (Entry Fee) नाही.

गेली दोन वर्ष एवढ्या मोठ्या महामारीनंतर सुद्धा यावर्षी हा महोत्सव यशस्वी होण्यामागे मागील सहा वर्षातील महोत्सवातील सर्वांचे परिश्रम व समर्थकांचा मिळालेला पाठिंबा आहे असे पूर्वेश सरनाईक (Executive President) यांनी सांगितले. विहंग प्रस्तुत संस्कृती आर्ट फेस्टिवलला मुख्य स्टेज पद्मश्री व पद्मभूषण उदित नारायण, डॉक्टर जसबिंदर नरुला, इंडियन आयडल सीजन १२ चा विजेता पवनदीप राजन, मैथिली ठाकूर तसेच इंडियन क्लासिकल सिंगर इत्यादी तसेच तरंग फ्लोटिंग स्टेज सगुण निर्गुण विदुषी कलापिनी कोमकली, सावनी शेंडे, पंडित भीमना जाधव, पंडित अनिदो चॅटर्जी, दीपिका भिड़े भागवत, सारंगी वेदक, संगीत मिश्रा, लिओडेल ऑस्ट्रेलिया हे सर्व कलाकार महोत्सवात सहभागी होणार आहेत.

# अबोली महिला रिक्षाचालकांच्या रॅलीने आरटीओच्या रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप




**ठाणे:** ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने ३३ व्या रस्ता सुरक्षा अभियानाच्या समारोपनिमित्ताने ठाण्यातील महिला अबोली रिक्षा, दुचाकी तसेच ठाण्यातील मोटार ड्रायव्हिंग ट्रेनिंग स्कुलची चारचाकी वाहने यांची रॅली काढण्यात आली. रॅलीचे उद्घाटन मराठी सिने व मालिकांमधील अभिनेत्री अश्विनी महांगडे यांच्या हस्ते करण्यात आले.

रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत रस्ता सुरक्षेचे महत्व कळावे, यासाठी ही रॅली काढण्यात आली. यावेळी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय शेळके, प्रसाद नलवडे, अशोक खेनट, गणेश पाटील, लेखाधिकारी श्रीमती अपर्णा पाटणे, ठाणे आरटीओ कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

लुइसवाडी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय (नविन आरटीओ) येथून रॅलीस सुरुवात झाली. या रॅलीत सुमारे ५० दुचाकी, ३० अबोली ऑटोरीक्षा, ठाण्यातील मोटार ड्रायव्हिंग ट्रेनिंग स्कुलची २५ चारचाकी वाहने यांनी सहभाग नोंदविला. रॅली लुईसवाडी येथून नितीन कंपनी- कॅडबरी कंपनी-पोखरण रोड नंबर-१-उपवन तलाव-टिकुजिनी वाडी रोड, मानपाडा-माजीवडा मार्गे पुन्हा प्रादेशिक परिवहन कार्यालय लुईसवाडी येथे येवून सांगता करण्यात आली.

अश्विनी महांगडे यांनी सर्वांनी रस्ता सुरक्षा विषयक नियमांचे पालन करून अपघात टाळण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी असे आवाहन करून महिलांना सुरक्षितपणे प्रवास करण्याची हमी देणाऱ्या आणि त्यासाठी ऑटोरिक्षाचे सारथ्य करणाऱ्या उपस्थित अबोली रिक्षा चालक महिलांचे कौतूक केले.


तर सहा. प्रादेशिक परिहवन अधिकारी प्रसाद नलवडे यांनी रॅलीत सहभागी झालेल्या, दुचाकी चालक, अबोली महिला रिक्षा चालक, मोटार ड्रायव्हिंग ट्रेनिंग स्कुलचे मालक/प्रतिनिधी यांचे आभार व्यक्त करून रस्ता सुरक्षा सप्ताह २०२३ ची सांगता झाल्याचे जाहीर केले.

# वर्तकनगरच्या पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाच्या नियमावलीला कात्री


## विकासक तुपाशी
## रहिवासी, गाळेधारक राहणार उपाशी
## स्थानिकांसाठी मनसेने उठवला आवाज

**ठाणे :** वर्तकनगर नाका येथील पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाच्या नियमावलीला कात्री लावल्याचा प्रकार समोर आला आहे. ठाणे पालिकेमार्फत या भूखंडावर पीपीपी अंतर्गत पुनर्विकास प्रकल्प प्रस्तावित आहे. २०१६ साली तयार केलेल्या या प्रकल्पाच्या निविदेत पूर्वीच्या २. ५ एफएसआयनुसार विकासकाने महापालिकेला प्रस्ताव सादर केला आहे. मात्र म्हाडाने सध्या ३. ० एफएसआयनुसार प्रकल्पाला परवानगी दिल्याने विकासकाला फायदा होणार असून यामध्ये ठाणे पालिका तसेच पर्यायाने येथील ३९ रहिवासी व ७४ गाळेधारकांचे नुकसानच होणार आहे, ही बाब मनसेच्या माध्यमातून उघडकीस आणण्यात आली आहे. याप्रश्नी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पालिका आयुक्त अभिजित बांगर यांना निवेदन देत जुनी निविदा तत्काळ रद्द करुन नवीन प्रस्ताव तयार करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे स्थानिकांना फायदा होणार असून पालिकेच्याही महसुलात भर पडणार आहे.

ठाण्यात सर्वाधिक पुनर्विकासाचे वारे वर्तकनगर परिसरात वाहत असून बड्या विकासकांचा येथील भूखंडांवर डोळा आहे. त्याच अनुषंगाने वर्तकनगर नाक्यावरील मोक्याचा ठिकाणी असलेल्या भूखंडावर पुनर्विकास प्रकल्प येऊ घातला आहे. याठिकाणी ३० ते ४० वर्षांपासून दुकानदार व्यवसाय करत असून काही भागात रहिवाशांचे वास्तव्य आहे. महानगरपालिकेमार्फत या भूखंडावर पीपीपी अंतर्गत पुर्नविकास प्रकल्प प्रस्तावित आहे. २०१६ मध्ये तयार करण्यात आलेल्या निविदेमध्ये पूर्वीच्या २. ५ एफएसआयनुसार विकासकाने पालिकेला प्रस्ताव सादर केला आहे. मात्र म्हाडाने सध्या ३. ० एफएसआयनुसार प्रकल्पाला परवानगी दिली आहे. त्याचा विकासकाचा फायदा होणार आहे. त्यामुळे महापालिकेने जुनी निविदा तत्काळ रद्द करुन नवीन प्रस्ताव तयार करावा, अशी मागणी मनसेचे विभागाध्यक्ष संदीप पाचंगे यांनी पालिका आयुक्त अभिजित बांगर यांना केली आहे. ३. ० एफएसआयनुसार प्रकल्पाला परवानगी दिल्यास महापालिकेचा, रहिवाशांचा, दुकानदारांचा फायदा होईल तसेच शासनास अतिरिक्त महसूल मिळेल, असेही पाचंगे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान, १ जानेवारी २०२१ ला पुर्नविकास प्रकल्पाकरिता आदेश देण्यात आला आहे. मात्र आजतागायत जागेवर कोणतेही काम चालु नाही. महानगरपालिकेने भूखंडावरील रहिवाशी, दुकानदारांशी संयुक्त बैठक लावून प्रकल्पासंदर्भात सविस्तर माहिती देणे अपेक्षित आहे. तसे केल्यास सर्वसामान्यांच्या प्रकल्पाबाबत असलेल्या शंकांचे निराकरण होईल, तसेच प्रकल्पाशेजारी असलेल्या तब्बल १२०० चौ.मी. जागेचा देखील या प्रकल्पात समावेश करावा. या ठिकाणी पूर्वी शिकाऊ मुलांचे वसतिगृह होते. या जागेचा वापर केल्यास महापालिकेला पार्किंग प्लाझा, कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मुलांना वसतिगृह अशा सुविधा देता येतील असे संदीप पाचंगे यांनी सांगितले.




# महापालिकेचा कचरा वाहतूक करणाऱ्या डंपरची उभ्या असणाऱ्या कारला धडक!




## डंपर चालक मद्यधुंद असल्याचा कारचालकाचा आरोप

**दिवा:-** दिवा प्रभाग समिती समोर उभ्या असणाऱ्या कारला बेधुंदपणे गाडी चालवणाऱ्या ठाणे महानगरपालिकेचा कचरा वाहतूक करणाऱ्या डंपरने जोरदार धडक देत गाडीचे मोठे नुकसान केले. याप्रकरणी कारमालकाने डम्पर चालका विरोधात डायघर पोलीस ठाण्यात कचरा टायगर पुढचा तक्रार दाखल केली आहे.

सदर वाहन चालक हा मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत असल्याचा आरोप चार चाकी गाडीच्या मालकाने केला आहे. या गाडीच्या मालकाने वाहतूक करणाऱ्या डंपर चालका विरोधात शनिवारी संध्याकाळी तक्रार दाखल केली असून प्रशिक्षित नसलेले व ड्युटी वर मद्यपान करून गाडी चालवणाऱ्या वाहन चालकावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. याचबरोबर जी ठेकेदार कंपनी दिवा डंपिंग वर कचरा वाहतूक करत आहे,त्या ठेकेदार कंपनी कडे प्रशिक्षित व व्यसन नसलेले चालक आहेत का?याची चौकशी ठाणे महानगरपालिका प्रशासनाने करावी अशी मागणी चार चाकी गाडीच्या मालकाने केली आहे.

# आजपासून ठामपा कार्यक्षेत्रात कोविशिल्ड लस उपलब्ध

**ठाणे :** राज्यशासनाकडून ठाणे महानगरपालिकेस कोविशिल्ड लसीचा साठा उपलब्ध झाला असून महापालिकेच्या नऊ आरोग्यकेंद्रात बुधवार १८ जानेवारी २०२३ पासून कोविशिल्ड लसीकरण सुरू झाले आहे. ज्या लाभार्थ्यांनी अद्यापपर्यत लसीकरण करुन घेतले नाही त्यांनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केले आहे.

कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, पार्किंग प्लाझा, किसन नगर आरोग्य केंद्र, मानपाडा आरोग्य केंद्र शिळ आरोग्य केंद्र, सी आर, वाडिया आरोग्य केंद्र, लोकमान्य कोरस आरोग्य, केंद्र रोझा गार्डनिया आरोग्य केंद्र, ठाणे महापालिका कौसा रुग्णालय या ठिकाणी कोविशिल्ड लसीकरण सुरू झाले आहे. १८ वर्षावरील ज्या नागरिकांचा कोविशिल्ड लसीचा पहिला, दुसरा व बुस्टर डोस दिला जाणार असून ज्यांचे कोविशिल्ड लस उपलब्ध नसल्यामुळे लसीकरण झालेले नाही तसेच ज्यांनी अद्याप लसीचा एकही डोस घेतलेला नाही त्यांनी लसीकरण करुन घ्यावे.

भारतात जरी कोरोना आटोक्यात असला तरी तो अजून संपलेला नाही. भारताव्यतिरिक्त इतर देशांमध्ये कोरोनाचे रुग्ण मोठ्याप्रमाणावर आढळून येत आहेत. तरी खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी लसीकरण करुन घ्यावे असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची जोरदार फटकेबाजी

## प्रत्येक बॉल मुख्यमंत्र्यांकडून सीमापार



### डाव्होसला रवाना होण्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी घेतलं धर्मवीर आनंद दिघे यांच्या समाधीचे दर्शन

**ठाणे :–** बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'धर्मवीर आनंद दिघे साहेब चषक २०२३' या क्रिकेट स्पर्धेला रविवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित राहून स्पर्धकांचा उत्साह वाढवला.यावेळी कार्यकर्त्यांनी केलेल्या विनंतीला मान देत क्रिकेटच्या मैदानात जोरदार बॅटिंग केली.

ठाणे शहरात आयोजित करण्यात आलेली ही सगळ्यात मोठी क्रिकेट स्पर्धा असून यंदा त्यात अनेक संघ सहभागी झाले आहेत. टेंभी नाका शिवसेना शाखेचे शाखाप्रमुख निखिल बुडजडे यांच्या पुढाकाराने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. आज वेळात वेळ काढून मुख्यमंत्री या स्पर्धेला हजर राहिले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने स्वित्झर्लंड येथील डाव्होस येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज रवाना झाले. तिथे जाण्यापूर्वी त्यांनी स्वर्गीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे समाधीस्थान असलेल्या शक्तीस्थळाला भेट देऊन त्यांना विनम्रपणे अभिवादन केले. एका सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा मुख्यमंत्री होण्यापर्यंतचा प्रवास ज्या धर्मवीरामुळे शक्य झाला त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी परदेशात रवाना होण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी शक्ती स्थळाला आवर्जून भेट दिली. त्यांची ही कृती शिवसैनिकांमध्ये चर्चेचा विषय ठरली.

यावेळी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे ठाणे शहरप्रमुख हेमंत पवार, टेंभी नाका बाळासाहेबांची शिवसेना शाखेचे शाखाप्रमुख आणि या स्पर्धेचे आयोजक निखिल बुडजडे, उपविभागप्रमुख स्वानंद पवार, जॅकी भोईर, नितेश पाटोळे आणि बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवयवदान जनजागृती रॅलीत २५० हून अधिक सहभागी




## ४० जणांनी केली अवयवदानची नोंदणी

**ठाणे :** अवयव दानाचे महत्त्व जनतेमध्ये वाढवून समाजात अवयवदान करणारे दाते निर्माण व्हावे याबाबत जागरूकता वाढवण्यासाठी रविवारी प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या वतीने मोटार सायकल रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीत अडीचशेहुन अधिक विद्यार्थी, बाईकर व नागरिकांनी सहभाग नोंदविला तर यावेळी अवयवदानाबद्दल प्रतिज्ञा घेणाऱ्या ४० दात्यांची नोंदणी करण्यात आली.

३३ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२३ अंतर्गत अवयव दानाचे महत्त्व जनतेमध्ये वाढवून समाजात अवयवदान करणारे दाते निर्माण व्हावे याबाबत जागरूकता वाढवण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे यांच्यासह रोटरी क्लब ऑफ ठाणे सनराईज, पिक्सन फोटोग्राफी कंपनी, बोरिवली मेडिकल ब्रदरहुड असोसिएशन तसेच युवान ग्रुप यांच्या संयुक्त उपक्रमाने हा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी कार्यक्रमास सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद नलवडे, सेवानिवृत्त सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी कमलेश चव्हाण, रोटरी क्लबचे डीस्ट्रीक्ट् गवर्नर कैलास जेठानी, रोटरी क्लब ऑफ ठाणे सनराईजचे अध्यक्ष अमित गवस, सेक्रेटरी रेणुका साळवी, लेखा अधिकारी अपर्णा पाटणे, पिक्सन फोटोग्राफी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित श्रीवास्तव, युवान ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक स्वप्नील मराठे, डॉ. राजेश पांचाल, राजेश सोळंकी व जयश्री सोळंकी इ. उपस्थित होते. या कार्यक्रमात एकूण २५० व्यक्तींनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये, प्रोफेशनल बायकर्स, बांदिवडेकर, जोशी बेडेकर, ज्ञानसाधना, ज्ञानगंगा या कॉलेजचे विद्यार्थी तसेच कर्मचारी व विविध संस्थांचे प्रतिनिधी, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

ही रॅली लुईसवाडी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय येथून सुरुवात होवून पोखरण रोड नंबर- २ मार्गे पलाई देवी मंदिर, उपवन ठाणे येथे सांगता झाली. समारोप कार्यक्रमात अवयवदानाबद्दल प्रतिज्ञा घेणाऱ्या ४० दात्यांची नोंदणी करून त्यांना युनिक रजिस्ट्रेशन नंबरचे डोनर कार्ड वाटप करण्यात आले. तसेच रॅलीमध्ये उपस्थित मान्यवरांना सन्मानचिन्ह व सर्व सहभागी होणाऱ्याना प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

रस्त्यावरील अपघातात जखमी व्यक्तींना अवयव दानाची आवश्यकता असते. परंतु दुर्दैवाने अवयवदानाचे महत्त्व आपल्या समाजात नसल्यामुळे अनेकजण वंचित राहतात. या वंचितांना अवयव प्राप्त झाल्यास त्यांना पुन्हा नवजीवन मिळू शकते.

एका व्यक्तीच्या अवयव दानाने आठ व्यक्तींना जीवनदान मिळू शकते. तसेच आपण नेत्रदान व शरीरातील पेशींचे दान देखील करु शकतात. त्यामुळे आपण जास्तीत जास्त ५० जीव वाचवू शकतो. जीवन मरणाच्या शेवटच्या टप्प्यावर असणा-या आजारी व्यक्तींचा जीव वाचवण्यासाठी आपले अवयवदान हे जीवनदायी ठरु शकते, अशा भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.

# कौसा-मुंब्रा मोतीबिंदूमुक्त करण्याचा निर्धार

## मर्जिया पठाण यांच्या पुढाकाराने १७५०जणांच्या शस्त्रक्रिया

**ठाणे :** विविध संस्था आणि संघटनांच्या माध्यमातून आपण मुंब्रा, कौसा शहर मोतीबिंदूमुक्त करण्याचा चंग बांधला आहे. अवघ्या दोनच शिबिरांमध्ये वतीने सुमारे १ हजार ७४३ जणांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून हे अभियान कायम सुरू ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती मर्झिया शानू पठाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वाढते प्रदुषण आणि बदलत्या वातावरणामुळे नागरिकांमध्ये मोतीबिंदूचे प्रमाण वाढीस लागले आहे. शासकीय रूग्णालयात मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया मोफत होत असल्या तरी त्यासाठी वेळखाऊ प्रक्रिया पार पाडावी लागत असल्याने अनेकजण या शस्त्रक्रिया करण्यास उत्सुक नसतात. त्यावर मात करण्यासाठी शंकर आय या रूग्णालयाच्या सहकार्याने यांनी मर्झिया पठाण यांनी मोतीबिंदूमुक्त अभियान सुरू केले आहे. सुलताना वेल्फेअर ट्रस्ट, संघर्ष सेवा भावी संस्था , गरीब नवाज ट्रस्ट , रेहमानिया मस्जिद ट्रस्ट,कौसा कोकणी फाउंडेशन, इत्तीहाद ट्रस्ट, नव जीवन मित्र मंडळ या संस्थांनी सदर अभियानामध्ये सहभाग घेतला आहे.

दर महिन्याच्या चौथ्या बुधवारी अमृत नगर आणि डायमंड हॉल येथे हे शिबिर राबविण्यात येणार आहे. हे अभियान बिगर राजकीय असून मुंब्रा, कौसा भागात एकही मोतीबिंदूचा रूग्ण ठेवायचा नाही, असा निर्धार मर्झिया पठाण यांनी व्यक्त केला. दरम्यान, याच अभियानासोबतच क्षयरोगमुक्त, घरोघरी अक्षर, मुंब्रा साक्षर हे दोन अभियानही राबविण्यात येणार असल्याचे पठाण यांनी सांगितले.



# यापुढे निर्माण होणाऱ्या प्रत्येक अनधिकृत बांधकामासाठी सहाय्यक आयुक्त जबाबदार राहतील

## अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमण निष्कासनासाठी केलेल्या कार्यप्रणालीची अंमलबजावणी करा

## आयुक्त अभिजीत बांगर यांचे निर्देश

**ठाणे :** महापालिकेच्यावतीने अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण यावर सातत्याने कारवाई सुरू आहे. परंतु ती कारवाई अधिक प्रभावीपणे व्हावी, यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकतीच एक बैठक बोलवली होती. त्यावेळी महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवरील कारवाई अधिक सातत्याने व परिणामकारक व्हावी यासाठी शासनाने ०२ मार्च २००९ च्या शासन निर्णयानुसार काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. त्यानुसार कार्यवाही व्यवस्थानात्मक पध्दतीने व्हावी यासाठी ठाणे महापालिका स्तरावर दिनांक ९ मार्च २००९ च्या आदेशानुसार कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

दरम्यान येथून पुढे निर्माण होणाऱ्या प्रत्येक अनधिकृत बांधकामासाठी सहाय्यक आयुक्त जबाबदार राहतील असे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील अतिक्रमणे निष्कासन करणे व नियंत्रण ठेवणेसाठी पोलीस विभागाच्या मदतीची नितांत आवश्यकता असून पोलीसांच्या मदतीने कारवाई करणेसाठी पोलीस विभागास आयुक्त बांगर यांनी अर्धशासकीय पत्र दिले आहे. तसेच महापालिकेच्यावतीने तयार करण्यात आलेल्या कार्यप्रणालीमध्ये प्रत्येक प्रभाग समिती स्तरावर अतिक्रमण निष्कासनासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी. ज्यामध्ये स्वतंत्र मनुष्यबळ, पोलीस कर्मचारी व यंत्रसामुग्री संपूर्णत: सहाय्यक आयुक्तांच्या अधिकारात उपलब्ध राहणे आवश्यक आहे तशी व्यवस्था करण्याच्या सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

आजमितीस प्रभाग समितीस्तरावर सहाय्यक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली पथके गठीत करण्यात आली असून यांच्या माध्यमातून प्रभाग समिती क्षेत्रात होणाऱ्या अतिक्रमणाची माहिती गोळा करणे, या पथके २४x७ प्रभाग समितीमध्ये कार्यरत राहतील अशा पध्दतीने नियोजन करुन त्यांच्या माध्यमातून प्रभाग समितीमधील अतिक्रमणावर प्राधान्यक्रम ठरवून कारवाई करण्याचे अधिकार संबंधित सहाय्यक आयुक्त यांना असतील व त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठीचे अधिकार परिमंडळ उपायुक्तांना देण्यात आले असल्याचे आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

प्रभाग कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर प्रभावीपणे कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांना त्यांचे आवश्यकतेनुसार डेडीकेटेड मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणेबाबत पत्रान्वये आयुक्तांनी निर्देश दिले आहेत. तसेच जर सहाय्यक आयुक्त, प्रभाग कार्यालय यांना अतिरिक्त मनुष्यबळ, व यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्यास संबंधित सहाय्यक आयुक्त यांनी उपायुक्त परिमंडळ यांचेकडे मागणी करावी व त्यानुसार उपायुक्त परिमंडळ यांनी मंजूर कंत्राटदार यांचेकडून अतिरिक्त मनुष्यबळ व यंत्रसामुग्री सहाय्यक आयुक्त यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याचप्रमाणे परिमंडळ अंतर्गतच्या इतर प्रभाग कार्यालयाकडे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध असल्यास ती उपायुक्त परिमंडळ यांनी सहाय्यक आयुक्त प्रभाग कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात यावी. जर कंत्राटदाराने आवश्यक मशीनरी उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ व विलंब केल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव पाठविणे अपेक्षित असल्याचेही त्यांनी नमूद केले. जेणेकरुन सदरची कार्यवाही अविरतपणे व प्रभावीपणे करणे शक्य होणार आहे. अतिक्रमण, निष्कासनाच्या कारवाईसाठी उपलब्ध करुन घेण्यात आलेले मनष्यबळ व यंत्रसामुग्री यांचा पूर्ण क्षमतेने वापर होण्याची दक्षता सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी व उपायुक्त परिमंडळ यांनी घ्यावयाची असल्याचेही आयुक्लत बांगर यांनी सांगितले

अतिक्रमणासाठी जी नियमावली तयार केली आहे त्यावर सहाय्यक आयुक्तांच्या स्तरावर अनधिकृत बांधकामासाठी टीमचे गठन, त्यांचे सक्षमीकरण सुनिश्चित केले आहे. येथून पुढे निर्माण होणाऱ्या प्रत्येक अनधिकृत बांधकामासाठी सहाय्यक आयुक्त जबाबदार राहतील याचीही जाणीव सहाय्यक आयुक्तांना त्या बैठकीत आयुक्त बांगर यांनी करुन दिली.

अतिक्रमण निष्कासनासाठी तसेच प्रभाग कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमणे, फेरीवाले, पोस्टर्स व बॅनर्स हटविणे कारवाई करण्यात येते याकरिता महापालिकेडून नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदाराकडील मनुष्यबळ व यंत्रसामुग्री तसेच महापालिकेकडील वापरण्यात आलेले मनुष्यबळ व आस्थापना यांचे वापरापोटी महापालिकेचा खर्च होतो. अनधिकृत बांधकाम निष्कासनासाठी महापालिकेस आलेला खर्च संबंधित जमीनमालक / अनधिकृत बांधकामधारक / विकासक यांच्याकडून वसूल करावा. तसेच त्याबाबतच्या कार्यपध्दतीमध्ये एकसूत्रता असणेकामी स्थायी कार्यप्रणाली ि निश्चित करण्यात आली असल्याचे आयुक्त बांगर यांनी नमूद केले. यानुसार ज्या जमीन मालकाचे / विकासकाचे अनधिकृत बांधकाम निष्कासनाकरिता महापालिकेस आलेला खर्च या स्थायी कार्यप्रणालीनुसार सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी वसूल करावयाचा आहे. सदरची रक्कम ही वसूल होत नसल्यास ती मालमत्ता कराची थकीत रक्कम आहे असे निश्चित करुन संबंधितांस वॉरंट बजावून जप्ती व संलग्न कारवाई करुन अशा खर्चाची रक्कम वसूल करण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांनी दिले.

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तैलचित्राचे अनावरण २३ जानेवारीला

**ठाणे:** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तैलचित्राचे अनावरण २३ जाने. २३ रोजी विधानभवनात होणार असल्याची माहिती, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी दिली.राहुल नार्वेकर म्हणाले की, हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे लोकप्रिय नेतृत्व आणि व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या कार्याची आणि योगदानाची ओळख व्हावी त्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तैलचित्राचे अनावरण लवकरात लवकर करावे असे निवेदन नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांना दिले होते.

या निवेदनानुसार अध्यक्षांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या दिवशी २३ जानेवारी रोजी विधानभवनात त्यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या अनावरण कार्यक्रमाला देशातील आणि राज्यातील मंत्र्यासह खासदार, आमदार आणि कला, क्रीडा, सिनेसृष्टी अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी यावेळी दिली.

# बंद पडलेल्या प्रशांतनगर एसआरए प्रकल्पाला मिळणार गती

## आमदार संजय केळकर यांची अधिकाऱ्यांशी चर्चा

**ठाणे:** ठाणे शहरात अनेक एसआरएचे प्रकल्प विविध कारणांनी रखडले असून आमदार संजय केळकर यांनी बुधवारी एसआरएच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन जाब विचारला. गेली दोन वर्षे बंद पडलेल्या प्रशांत नगरच्या प्रकल्पाबाबतही अधिकारी आणि विकासकांना धारेवर धरल्यानंतर रहिवाशांना दिवाळीपर्यंत घरे देण्याचे आश्वासन देण्यात आले.

शहरात झोपडपट्टी पुनर्विकासासाठी एसआरए योजना सुरू आहे, मात्र विविध कारणांनी हे प्रकल्प रखडले आहेत. रहिवाशांनी घरे रिकामी केल्यानंतर विकासक आधी विक्रीच्या घरांच्या इमारतीचे बांधकाम सुरु करतात, त्यामुळे रहिवाशांना त्यांची घरे वर्षानुवर्षे मिळत नाहीत. अशात विकासकाकडून घरभाडे वेळेवर मिळत नसल्याने रहिवासी देशोधडीला लागतात. हे प्रकल्प तातडीने मार्गी लागून रहिवाशांना त्यांची हक्काची घरे मिळावीत अशी मागणी आज आमदार संजय केळकर यांनी एसआरएच्या कार्यालयात अधिकाऱ्यांकडे केली.

यावेळी केळकर यांनी प्रशांत नगर येथील दोन वर्षे रखडलेल्या एसआरए प्रकल्पातील रहिवाशांची व्यथा अधिकाऱ्यांसमोर मांडत जाब विचारला. पुढील वर्षी मार्चपर्यंत या रहिवाशांना घरांचा ताबा देण्याचे मान्य करण्यात आले तसेच दिवाळीपर्यंत एक इमारत पूर्ण होईल असे आश्वासनही यावेळी देण्यात आले. या बैठकीस माजी नगरसेवक सुनेश जोशी, डॉ. राजेश मढवी, आणि शेकडो रहिवासी उपस्थित होते.

अधिकाऱ्यांबरोबर सकारात्मक चर्चा झाली असून प्रशांत नगरचा प्रकल्प मुदतीत पूर्ण होणार असल्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच अधिकारी दर महिन्यास या प्रकल्पाची पाहणी करून बांधकामांचा आढावा घेतील. मुदतीत प्रकल्प पूर्ण झाला नाही तर रहिवाशांना घेऊन कायदेशीर मार्ग चोखाळ, प्रसंगी तीव्र आंदोलनाचा मार्गही स्वीकारू, असा इशारा आमदार संजय केळकर यांनी दिला.

# शहर टिकवायची असतील तर शहरातील झाड ही टिकली पाहिजेत, वाढली पाहिजेत!

# वृक्षप्रेमी निलेश चव्हाण!



**ठाणे:**-ठाणे शहरातील राम मारुती रोड वरील सत्कार हेअर ड्रेसर्स व आजूबाजूच्या इतर दुकानदारांनी एका कुंडीत जोपासलेले दहा बारा फुट उंच मोठे वडाचे झाड तिथून आणून भाजपचे उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांनी यशस्वीनगर येथील जमिनीत आणून लावले. काही वर्षांनी या वडाचे रूपांतर एका महाकाय वृक्षात होऊन तो असंख्य पक्ष्यांचे आश्रयस्थान बनेल व दाट सावली देईल, म्हणून हे झाड लावताना विशेष आनंद झाला अशी भावना निलेश चव्हाण यांनी हे झाड लावल्यानंतर व्यक्त केली.

ठाण्यासारख्या महानगरात वाढती लोकसंख्या आणि दुसरीकडे सिमेंटची जंगला वाढत असताना ऑक्सिजन देणारी झाडे देखील वाढायला पाहिजेत ही भावना प्रत्येक ठाणेकरांच्या मनात वाढीस लागावी या हेतून वृक्ष लागवडीत काम आपण नियमित करत असतो असे निलेश चव्हाण यावेळी म्हणाले.

याकामात त्यांना गिरधारीलाल, शेषनाथ, रत्ना, राहुल, सत्यनारायण यांचे सहकार्य लाभले. यावेळी निलेश चव्हाण यांचा मुलगा युगविर देखील उपस्थित होता.



# 'ब्रीथ ईझी, झिरो इंमिशन, नो नॉईज' अशा पर्यावरणपूरक ई- बसेस ठाणेकरांच्या सेवेत होणार दाखल

**ठाणे:** येऊरसारखा जैवविविधतेने नटलेला डोंगर लाभलेले ठाणे शहराचा समावेश स्मार्ट सिटी मध्ये आहे. 'स्वच्छ, सुंदर ठाणे' शहर आता आणखीनच बदलू लागले आहे, शहरातील भिंती बोलू लागल्याने या शहराच्या सौंदर्यीकरणात आणखीनच भर पडत आहे. याचाच एक भाग म्हणून ठाणे शहराची वाहिनी समजल्या जाणाऱ्या परिवहन सेवेचे बदलते रुप लवकरच ठाणेकरांना अनुभवयास मिळणार आहे. होणार असून 'ब्रीथ ईझी, झिरो इंमिशन, नो नॉईज' अशा पर्यावरणपूरक ई- बसेस ठाणे शहराला एक नवीन ओळख देणार असल्याचे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले.

स्वच्छ वायू (Clean Air Action Plan) कृती आराखड्याअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी (१७ जानेवारी) महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या दालनात बैठक पार पडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त २ संजय हेरवाडे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त तुषार पवार, अनघा कदम, प्रदुषण नियंत्रण अधिकारी मनिषा प्रधान, मुख्य लेखा वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी व परिवहन सेवेचे अधिकारी उपस्थित होते.

ग्लोबल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक योजना महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून इलेक्ट्रीकल बसेस उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरू आहे, यात अत्याधुनिक ई बसेस परिवहन सेवेच्या ताफ्यात लवकरच दाखल होणार आहेत, यासाठीची संपूर्ण प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त बांगर यांनी दिले. जानेवारी २०२३ अखेरपर्यत ३२ ई बसेस प्राप्त होणार असून जून २०२३ पर्यत उर्वरित ९१ ई-बसेस प्रत्यक्ष सेवेत दाखल होणार आहेत, या बसेस दिलेल्या वेळेतच प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी, जर याकामी विलंब झाला तर करारनाम्यातील अटीनुसार ठेकेदारास दंड आकारला जाईल असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले. नव्याने उपलब्ध होणाऱ्या बसेस महापालिका क्षेत्रात सर्वात कमी उत्पन्न असणाऱ्या डिझेल बसच्या मार्गिकेवर चालविण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले.

# ध्येय गाठण्यासाठी कष्टासोबतच देशाप्रती योगदान द्या...




## विश्वास नांगरे - पाटील यांनी जागवला नविन पिढीच्या मनात 'विश्वास'

**ठाणे: अपयशाला न घाबरता आपले ध्येय गाठण्यासाठी अपार कष्टासोबत प्रत्येकाने देशाप्रती योगदान द्यावे. असा 'विश्वास' महाराष्ट्रातील लाखो तरुणांचे आयकॉन अप्पर पोलीस महासंचालक विश्वास नांगरे-पाटील यांनी नविन पिढीच्या मनात जागवला. त्याचबरोबर मोबाईल आणि समाज माध्यमांच्या (सोशल मिडिया) विळख्यात अडकलेल्या नव्या पिढीला या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आपल्या देशातील प्रेरणास्थाने, देशप्रेम, नातेसंबंधाची जाणीव, सामाजिक बांधिलिकी याची जाणीव करून देणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.**

ठाणे पूर्वेतील सुयश कला-क्रीडा मंडळ, श्री सिध्दीविनायक मंदिराच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेचे पहिले पुष्प शुक्रवारी, विश्वास नांगरे -पाटील यांच्या व्याख्यानाने गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, मंडळाचे जयदीप कामत, मुधसूदन राव, गजानन पालवे , सतीश सावंत , सुरेश तिवटणे ,गिरीश राजे, हेमंत पवार आदी मान्यवर उपस्थित होते. व्याख्यानमालेच्या प्रारंभी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून प्रथम पुष्प गुंफणारे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

पोलीस सेवेतील कारकिर्दीचा आढावा घेत,कविता, शेरोशायरीचा चपखल वापर करत नांगरे-पाटील यांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.तसेच, त्यांनी छडा लावलेल्या अनेक प्रकरणांच्या तपासाचा उहापोह केला.

केंद्रीय लोकसेवा आयोगाची परिक्षा देतांना केलेल्या संघर्षांच्या आठवणी सांगुन आता या स्पर्धा परिक्षेत मराठी मुलांचा टक्का वाढत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. लोकमान्य टिळकांनी उदात्त हेतुने सार्वजनिक गणेशोत्सव सुरु केले, मात्र आज या उत्सवाला बिभत्स स्वरूप आले आहे.याविरोधातील आपल्या लढ्याला न्यायालयाचेही समर्थन मिळत असल्याचे सांगुन नांगरे-पाटील यांनी, आपल्याला मुन्नाभाई ... सारख्या चित्रपटातून गांधीजींचे तत्वज्ञान कळते.याची खंत वाटत असल्याचे म्हटले. २६-११ च्या हल्ल्यात अतिरेक्यांशी लढतांना केलेल्या व्यूहरचनेबद्दल सांगुन त्यांनी, अपयशाला न घाबरता, नकारात्मक विचार बाजूला ठेवुन विश्वासाने सामोरे जावे. तसेच आपले ध्येय गाठण्यासाठी खूप कष्ट करून देशाप्रती योगदान द्यावे,असा 'विश्वास' त्यांनी तरूणाई मध्ये जागवला.